नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४२ Issue - 42 | वार शनिवार दि. २८ जून २०२५ Blow- Saturday Date 28 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## महिला शिक्षिका बरोबर अक्कलकोट गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांचे गैरवर्तुवणुकीमुळे जिल्हा परिषदेकडून चौकशी समिती नेमून चौकशी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**अक्कलकोट/विशेष प्रतिनीधी**

अक्कलकोट तालुक्यातील एका शाळेमध्ये महिला शिक्षिका वारंवार भेटायला बोलवणे वारंवार शाळेला विजिट करणे कार्यालयात एकटीला बोलावून गैरवर्तन करणे असे अनेक वेळा पंचायत समिती अक्कलकोट येथील बीआरसी कार्यालय मध्ये केंद्रप्रमुखामार्फत बोलावणे नको ते बोलणे आणि दोन कोरा धनादेश सही केलेले घेतलेअसे अनेक वेळा घडून सुद्धा सदर महिला शिक्षिका साहेब आहे या भीतीने कुणालाही सांगितले नव्हते नंतर सदर महिला शिक्षिका त्यांचे मागणीला सहकार न केल्याने त्यांचे वर्गावर जाऊन व्हिडिओ करून मुलीसमोर कारवाई करण्याचे दमदाटी करणे . असे मानसिक व शारीरिक त्रास देत असल्याने सदर महिला शिक्षिका कंटाळून सोलापूरचे जिल्हाधिकारी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांना सदर अधिकारी विरोधात लेखी तक्रार दिल्याने माननीय शिक्षण अधिकारी यांनी त्रिसदस्य समिती नेमून चौकशी करण्याचे आदेश काढलेले आहे .

या अगोदरही सदर प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत रबाळे तक्रारी आहेत आणि अनेक शिक्षक संघटनेचा तक्रारी आहेत त्यांच्या विरोधात अनेक संघटनेने सदर अधिकारी विरोधात अनेक तक्रारी केले आहे आणि त्या तक्रारीत दोषी सुद्धा सापडले आहे. प्रभारी गटशिक्षणाधिकारी चार्ज घेतल्यापासून अनेक तक्रारी त्यांच्या विरोधात दाखल आहेत तरीसुद्धा प्रशासन सदर अधिकारी वर कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहे त्यामुळे त्यांचे चुका मध्ये सुधारण होत नाही.

गटशिक्षणाधिकारी कार्यालय मध्ये भेटण्यासाठी आलेल्या लोकांना सुद्धा अरे तुरे भाषा बोलून माझे कार्यालयातून बाहेर चला असे उद्धटपणाने लोकांशी वागत असलेले अनेक तक्रारी त्यांच्या विरोधात आहेत.

## राज्यातील ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील महायुती सरकारकडून गेल्या काही महिन्यात आएएस आणि आयपीएस (खझड) अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका लावण्यात आल्याचं पाहायला मिळत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सातत्याने बदल्या (ढीरपीषशी) होत असून आता तब्बल ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, पुणे, मुंबई (चींलरळ), नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, धुळे, हिंगोली, जळगाव येथील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामध्ये, पुण्यातील शस्त्र निरीक्षक शाखा पोलीस अधीक्षकपदी असलेल्या तेजस्वी सातपुते यांची समादेशकपदी बदली करण्यात आली आहे. पुणे राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ पदावर त्यांना नियुक्ती देण्यात आली आहे. तर, महेंद्र पंडित यांची स्तंभ २ मधून स्तंभ ३ मध्ये नमूद पदावर बदली करण्यात आली आहे. त्यानुसार, महेंद्र पंडित यांना बृह्नमुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.




राज्यभरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून तब्बल ८१ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून ५१ खझड अधिकार्यांना काहींना प्रमोशन तर काहींचे डिमोशन करुन बदली करण्यात आली आहे. पुण्यातील परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे बदली करण्यात आली असून वाहतूक पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांची देखील बदली करण्यात आली आहे. सरकारच्या नव्या बदली आदेशान्वये पुण्यामध्ये तीन नव्या आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात गेल्या १५ दिवसांपूर्वी ८ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतर गेल्या आठवड्यात पुन्हा चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश जारी करण्यात आले होते. त्यामध्ये मुंबई मेट्रो क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांची वर्ध्याच्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. तर अमरावतीचे आयुक्त सचिन कळंत्रे यांची बदली पुण्यातील यशदाचे उपसंचालकपदी करण्यात आली. त्यानंतर, आता ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याआहेत.

कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक तुषार पाटील यांची मुंबईत पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, विजय पवार, सुनिल लोखंडे, नम्रता पाटील आणि स्मिता पाटील यांची मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. म्हणजेच मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर ५ आयपीएस अधिकाऱ्यांची पदोन्नतीवर नेमणूक करण्यात आली आहे.

## स्मार्ट प्रकल्पांतर्गत कापूस, हळद आणि मका पिकांसाठी हेजिंग डेस्क : मुख्यमंत्री फडणवीस

### शेतमालाच्या बाजारमूल्य निश्चितीमुळे शेतकऱ्यांना अधिक फायदा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य बाजारमूल्य मिळावे यासाठी, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, स्मार्टअंतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे येथे कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू केला आहे. टप्प्या-टप्प्याने इतर पिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी त्यांच्या उत्पादनांच्या भविष्यातील किंमतीतील चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. 'सेबी'चे नियंत्रण असलेल्या एनसीडीईएक्स (छउऊएद) संस्थेच्या कमोडिटी मार्केट्स आणि संशोधन संस्थेने (छखडउ) या प्रकल्पासाठी सहकार्य केले आहे. हा उपक्रम कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची माहिती देताना सांगितले.

'हेज' म्हणजे बाहेरून येणाऱ्या संकटांपासून संरक्षण देण्यासाठी, त्यांना अटकाव करण्यासाठी बांधलेले साधन, घराला जसे दार, तसे शेताला कुंपण. किंमतीच्या चढ-उतारातून निर्माण होणाऱ्या संकटापासून संरक्षण देणारे जे साधन तेही एक प्रकारचे कुंपणच आहे ज्याला 'हेजिंग' म्हणतात. भविष्यकाळातील कमी होणाऱ्या किंमतींपासून निर्माण होणारी जोखीम कमी करणे हा 'हेजिंग' चा मुख्य उद्देश आहे. भविष्यकाळातील वाढणाऱ्या किंमतीचा फायदा घेण्यासाठी ऑप्शन ट्रेडिंगचा वापर केला जाऊ शकतो. जागतिक बँकेच्या सल्ल्यानुसार आणि प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी शेतमालाच्या किंमतीतील जोखीम कमी करण्यासाठी वायदे बाजारात सहभागी होण्याकरिता तसेच त्यांना याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यासाठी 'हेजिंग डेस्क' (क्शवसळपस ऊशीज्ञ) सुरु करण्यात आलेला आहे.

शेतकऱ्यांना बाजारपेठेतील अनिश्चितेपासून वाचवण्यासाठी 'हेजिंग डेस्क'

कृषी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याचा राज्याच्या सकल उत्पन्नात १२% वाटा आहे. मात्र, राज्यातील शेतीमध्ये पिकांचे उत्पादन अजूनही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. शेतीमध्ये पेरणी करूनही निश्चित क्षमतेनुसार उत्पादन आणि उत्पादित मालाला योग्य भाव मिळण्याबाबत शेतकऱ्यांना नेहमीच चिंता असते. शेतकरी पिकांचे उत्पन्न घेतो तरी मालाची किंमत ठरवणारा नसतो. ही अनिश्चीतता कमी करण्यासाठी शासनाकडून देखील विविध शासकीय धोरणे, सुधारित शेती पद्धती, विविध पिक विमा योजना यांचे पाठबळ शेतकऱ्यांना दिले जाते. शेतीतून किमान उत्पन्न मिळवण्यासाठी शाश्वत उपायोजना करणे गरजेचे आहे. हेच लक्षात घेवून वैयक्तिक शेतकरी, मर्यादित संसाधने लक्षात घेवून शेतकऱ्यांना बाजारपेठेतील ज्ञान मिळावे, यासाठी शासनाने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शेतकऱ्यांना बाजारातील अनिश्चिततेपासून वाचविण्यासाठी एककेंद्रीत समर्पित कृषी हेजिंग डेस्कची स्थापना पुणे येथे करण्यात आली आहे.

### शालेय शिक्षणात हिंदी सक्ती केल्याने मुंबईत मोर्चा

### कार्यकर्त्यांना केले आवाहन

## ठाकरे बंधूंच्या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीर पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शालेय शिक्षणात हिंदी विषय सक्तीचा केल्याने वादाला तोंड फुटले आहे. कालच शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राज ठाकरे ंची भेट घेतली. मात्र, राज ठाकरे हे आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. हेच नाही तर ५ जुलैला मुंबईमध्ये शालेय शिक्षणात हिंदी सक्ती केल्याने त्याच्याविरोधात मोर्चा काढला जाणार आहे. यानिमित्त्याने दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि मनसेचा मोर्चा आहे. राज ठाकरे यांनी मराठीसाठी या मोर्चात सर्व पक्षांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. अगोदर या मोर्चाची तारीख ही ६ जुलै असल्याचे राज ठाकरेंनी जाहीर केले. मात्र, आता शिवसेना ठाकरे गट आणि मनसे एकत्र येऊन हा मोर्चा ५ जुलैला निघेल. आता या मोर्चाबद्दल शरद पवारांच्या पक्षानेही मोठा निर्णय घेतलाय.

५ तारखेच्या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने जाहीर पाठिंबा दिलाय. महाराष्ट्राहिताचा प्रश्न उभा राहतो, तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केली भूमिका. मराठीच्या समर्थनार्थ पुकारलेल्या ५ जुलै रोजीच्या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने पाठिंबा दर्शविला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी एक पत्र ट्विट करत भूमिका स्पष्ट केली आहे.



पत्रात जयंतराव पाटील यांनी म्हटले की, महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याअंतर्गत त्रिभाषा सूत्राचं समीकरण पुढे करत इयत्ता पहिलीपासून शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषा बंधनकारक करण्याचे योजिले आहे. ह्याविरोधात महाराष्ट्रात मराठी भाषिकांमध्ये टोकाचं जनमत तयार होत आहे. अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ अशा सर्व मान्यवरांनी त्रिभाषा सूत्र इयत्ता पहिलीपासून राबविण्यास विविधं आक्षेप नोंदविले आहेत. पण कुणालाही न जुमानता राज्य सरकार 'हिंदी सक्ती'साठी हट्ट धरून बसलं आहे असे ते म्हणाले.

खरं तर, महाराष्ट्राच्या जनमानसाचा कानोसा घेतलात तर जाणवतं की, कुणाचाही विविध भाषा शिकण्याला किंबहुना हिंदी भाषेलाही विरोध नाही, पण इयत्ता पहिलीपासूनच प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हावं असा आग्रह आहे, जो योग्य आहे. शैक्षणिक धोरणाच्या त्रिभाषा सूत्राआडून मातृभाषेला डावलण्यासाठी प्रयत्न होत असतील तर मराठी माणूस एकदिलाने त्याचा विरोध करणार, ह्याची सत्ताधाऱ्यांनी नोंद घ्यावी असा इशाराही दिला.

महाराष्ट्र सरकारच्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत त्रिभाषा सूत्रान्वये केल्या जाणाऱ्या हिंदी सक्तीला विरोध करण्यासाठी येत्या शनिवारी, ५ जुलै २०२५ रोजी तमाम मराठीजनांकडून मुंबईत एक मोर्चा पुकारण्यात आला आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचा ह्या मोर्चाला संपूर्ण पाठिंबा आहे. महाराष्ट्राहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे. म्हणून पदाधिकारी, कार्यकर्त्ये सर्वांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे जयंत पाटील यांनी आपल्या पत्रात म्हटले.

## सांगोल्यासाठी नवीन एमआयडीसी उभारण्याची मा. आ. पाटील यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्याचे माजी आमदार आणि शहाजी बापू पाटील यांनी सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन भव्य एमआयडीसी उभारावी अशी मागणी उद्योग मंत्री नामदार उदय सावंत यांची भेट घेऊन केली व सांगोला तालुक्यातील तरुणाच्या हाताला रोजगार देण्याची राज्याचे उद्योग मंत्री उदय सावंत यांनी नवीन एमआयडीसी मंजूर करण्याची आश्वासन माजी आमदार आणि शहाजी बापू पाटील यांना दिले आहे. नवीन एमआयडीसी मुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास मदत होणार आहे.



आमदार शहाजी बापू पाटील यांनी केलेल्या मागणीला मोठे यश आले आहे भविष्यात उद्योग व्यवसाय वाढल्याने तालुक्याचे क्रांती होईल अशी माहिती सांगोला तालुक्याची माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी दिली आहे.

आमदार शहाजीबापू पाटील यांनी केलेल्या मागणीस मोठे यश आले आहे भविष्यात उद्योग व्यापार वाढल्यानंतर सांगोला तालुक्याचा सर्वांगीण विकास होईल असे शहाजी बापू पाटील यांनी सांगितले.

नवीन एमआयडीसी उभे करण्याचे आश्वासन शहाजीबापू पाटील यांना दिले आहे. नवीन एमआयडीसी मुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास होणार आहे

माजी आमदार अँड शहाजी बापू पाटील यांनी केलेल्या मागणीस मोठे यश आले आहे व नवीन उद्योग व्यवसाय वाढल्याने तालुक्यात क्रांती होईल अशी माहिती सांगोला तालुक्याचे माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी दिली आहे.

उद्योग मंत्री उदय सावंत यांच्या भेटी प्रसंगी अभिजीत नलावडे योगेश खटकाळे विशाल खटकाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी आमदार अँड शहाजी बापू पाटील यांच्या मागणीला मोठे यश आले आहे नवीन एमआयडीसी मुळे तालुक्याच्या उद्योगाला मोठे जाळे निर्माण होईल तरुणांच्या हाताला काम मिळेल व तालुक्याची आर्थिक व्यवस्था बळकट होईल. उभे राजगार तरुणांना हाताला काम मिळेल. त्यामुळे सांगोला तालुक्याच्या व्यापार दृष्टीने तालुक्याचा सर्वांगीण व्यापारी उद्योगधंद्यामुळे तालुक्याचा विकास आघात कायापालट होईल अशी माहिती माजी आमदार अँड शहाजी बापू पाटील यांनी दिली.

## संपादकीय....

### हेजिंग डेस्कचे कुंपण

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य बाजारमूल्य मिळावे यासाठी, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, स्मार्टअंतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे येथे कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू केला आहे. टप्प्या-टप्प्याने इतर पिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी त्यांच्या उत्पादनांच्या भविष्यातील किंमतीतील चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. 'सेबी'चे नियंत्रण असलेल्या एनसीडीईएक्स संस्थेच्या कमोडिटी मार्केट्स आणि संशोधन संस्थेने या प्रकल्पासाठी सहकार्य केले आहे. हा उपक्रम कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल आहे. 'हेज' म्हणजे बाहेरून येणाऱ्या संकटांपासून संरक्षण देण्यासाठी, त्यांना अटकाव करण्यासाठी बांधलेले साधन, घराला जसे दार, तसे शेताला कुंपण. किंमतीच्या चढ-उतारातून निर्माण होणाऱ्या संकटापासून संरक्षण देणारे जे साधन तेही एक प्रकारचे कुंपणच आहे ज्याला 'हेजिंग' म्हणतात. भविष्यकाळातील कमी होणाऱ्या किंमतींपासून निर्माण होणारी जोखीम कमी करणे हा 'हेजिंग' चा मुख्य उद्देश आहे. भविष्यकाळातील वाढणाऱ्या किंमतीचा फायदा घेण्यासाठी ऑप्शन ट्रेडिंगचा वापर केला जाऊ शकतो. जागतिक बँकेच्या सल्ल्यानुसार आणि प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी शेतमालाच्या किंमतीतील जोखीम कमी करण्यासाठी वायदे बाजारात सहभागी होण्याकरिता तसेच त्यांना याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यासाठी 'हेजिंग डेस्क' सुरु करण्यात आलेला आहे. कृषी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याचा राज्याच्या सकल उत्पन्नात १२% वाटा आहे. मात्र, राज्यातील शेतीमध्ये पिकांचे उत्पादन अजूनही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. शेतीमध्ये पेरणी करूनही निश्चित क्षमतेनुसार उत्पादन आणि उत्पादित मालाला योग्य भाव मिळण्याबाबत शेतकऱ्यांना नेहमीच चिंता असते. शेतकरी पिकांचे उत्पन्न घेतो तरी मालाची किंमत ठरवणारा नसतो. ही अनिश्चीतता कमी करण्यासाठी शासनाकडून देखील विविध शासकीय धोरणे, सुधारित शेती पद्धती, विविध पिक विमा योजना यांचे पाठबळ शेतकऱ्यांना दिले जाते. शेतीतून किमान उत्पन्न मिळवण्यासाठी शाश्वत उपायोजना करणे गरजेचे आहे. हेच लक्षात घेवून वैयक्तिक शेतकरी, मर्यादित संसाधने लक्षात घेवून शेतकऱ्यांना बाजारपेठेतील ज्ञान मिळावे, यासाठी शासनाने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शेतकऱ्यांना बाजारातील अनिश्चिततेपासून वाचविण्यासाठी एककेंद्रीत समर्पित कृषी हेजिंग डेस्कची स्थापना पुणे येथे करण्यात आली आहे.

## ३० जूनपासून दुपारच्या सत्रात शाळा भरणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : विदर्भात राज्य मंडळाच्या शाळा २३ते २८ जुन पर्यंत सकाळ सत्रात ७ते ११:४५ या वेळेत भरणार आहेत तर ३० जून पासून दुपारच्या सत्रात शाळा नियमित सुरू करण्याचे निर्देश राज्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. श्रीराम पानझडे. व प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले आहेत.

तालुकानिहाय लाभार्थी विद्यार्थी संख्या

मोफत पाठ्य पुस्तके वितरणाची तालुकानिहाय लाभार्थी विद्यार्थी संख्या याप्रमाणे आहे बुलढाणा, २५,६८४ चिखली२७, ८८७ दे. राजा. १४,०५१ सिं. राजा, १५,०२३ लोणार, १४,६२३मेहकर २६,००३ खामगाव, २८,३७७ शेगाव,११,९८८ संग्रामपूर , १४,८७५ ज. जामोद, १७,६८७ नांदुरा १५,८३५ मलकापूर १६ , ८६७ मोताळा , १६,३०७

दोन लाख ४४ हजार विद्यार्थ्यांना मिळणार पाठ्य पुस्तके शिक्षणाचा दर्जा उंचावणे गळतीचे प्रमाण कमी करणे आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे या हेतूने समग्र शिक्षण आभियानांतर्गत जिल्ह्यातील दोन लाख ४४ हजार २६८ विद्यार्थ्यांना सुमारे १५ लाख १७ हजार पुस्तकांचे वितरण करण्यात येणार आहे शाळांमधील उपलब्ध पटसंख्येनुसार पुस्तके वितरीत करण्याचे, नियोजन गटशिक्षण अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# 'माझ्या भीमाच्या नावाचं'... गाण्याचे रचनाकार भीमराव काळेनंद यांचे महाप्रयाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आपल्या कलेच्या माध्यमातून फुले -शाहू-आंबेडकर चळवळ जिवंत ठेवण्याच्या कामासोबतच महामानवांचे विचार घराघरात पोहोचवण्याचे कार्य सामाजिक कार्यकर्ते,कवी, साहित्यिकांनी आणि कलाकारांनी वेळोवेळी केले आहे. त्यातीलच एक नाव म्हणजे महाराष्ट्राचे ख्यातनाम ज्येष्ठ गीतकार, गायक भीमराव अर्जुन काळेनंद (कुंभेफळकर) यांच्या कार्याला माझा सलाम...

लहानपणापासूनच त्यांना लिखाणाची आवड होती. लेखणीतून समाजप्रबोधन घडावे, गाण्यातून परिवर्तन घडावे या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन काळेनंद दादांनी हातात लेखणी घेतली आणि अनेक गाणी जन्माला घातली.

भीमराव काळेनंद बीड जिल्ह्यातील, आष्टी तालुक्याचे रहिवासी होते. कुंबेफळ हे त्यांचे मूळ गाव. कुंबेफळ नावाच्या खेड्यात एका गरीब कुटुंबात काळेनंद यांचा जन्म झाला . हलाखीच्या परिस्थितीतही न खचता ते पुढे वाटचाल करत राहिले. कालांतराने बरीच वर्षे त्यांनी मुंबईत कल्याण तालुक्यात मोहोने आंबेवाडी या ठिकाणी वास्तव्य केले. १९७२ साली ते मुंबईत आले. खेडेगावात जन्माला आलेल्या या व्यक्तिमत्वाने आपल्या गावाचे नाव कला आणि लेखणीच्या जोरावर संपूर्ण महाराष्ट्रात नेले. इयत्ता आठवीला असताना त्यांनी गाणी लिहायला सुरुवात केली.१९७२ मध्ये त्यांनी पहिले गाणं रेकॉर्ड केलं आणि भीमराव काळेनंद यांनी प्रेक्षकांच्या मनात जागा निर्माण केली. वडील भजन करायचे, त्यांच्यासोबत मी जायचो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर गीतरचना करायचो असे देखील त्यांनी मला सांगितले.

आजपावेतो ५००० हून अधिक भीमगीते, लोकगीते, प्रबोधनगीते, भक्तिगीते, भजन-पोवाडे यांची रचना केली. काळेनंद दादांनी सुरुवातीच्या काळात कल्याण येथील रुक्मिणी रुग्णालयात काम केले. त्यानंतर वडिलांच्या इच्छेनुसार एन.आर.सी कंपनीमध्ये २७ वर्षे नोकरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. कंपनीमध्ये नोकरी करताना आपले लिखाण अव्याहतपणे त्यांनी सुरूच ठेवले. सोबतच तबला, ढोलकी, पेटी, हार्मोनियम अशा प्रकारचे वाद्य वाजविण्याचाही त्यांना छंद होता.

'माझ्या भीमाच्या नावाचं कुंकू लावील रमानं', 'सहा डिसेंबर छप्पन साली', 'मी जगेल तर या समाजासाठी', मी मरेल तर या समाजाच्यासाठी',अशी अनेक स्फूर्तिदायक गीते प्रचंड लोकप्रिय झाली. 'तर भिमान मढवल तुला माणूस घडवलं', 'लाख मताने निवडून आली माता रमामूळ त्या', 'बुद्धाची जयंती', 'सिद्धार्था आम्हाला सोडून जाऊ नको', , फिरे घेऊन झेंडा निळा', 'कोरोना जनजागृती', 'भक्तिगीते, लोकगीते अशी अनेक गाणी त्यांनी लिहिली.

सुषमा देवी यांनी आपल्या पहाडी आवाजाने गायिलेले 'माझ्या भीमाच्या नावाचं, कुंकू लाविलं रमानं' या गाण्याने संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घातला. या गाण्याशिवाय डॉ. बाबासाहेबांची जयंती असो किंवा विविध सांस्कृतिक कार्यक्रम असो हे गाणे वाजविल्याशिवाय प्रेक्षकांना चैन पडत नाही. असे हे गाणे आज प्रत्येक भीम अनुयायांच्या आणि सर्वांच्या ओठावर आल्याशिवाय राहत नाही. त्या गाण्याचे कवी म्हणजे भीमराव अर्जुन काळेनंद...

या गाण्याचा शेवट त्यांनी असा केला आहे की, 'काळेनंद अशी ही मायी, झाली नवकोटीची आई! ती वागली प्रेमानं कुंकू लावील रमानं' हे गाण्याचे कडवं ऐकताच काळेनंद दादा यांची आठवण मनाला चटका लावून जाते...

तसेच ६ डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याा महापरिनिर्वाण दिनी महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राच्या बाहेरील नागरिकांच्या स्टेटस्वरती एकच गाणं झळकत ते म्हणजे 'सहा डिसेंबर छप्पन साली वेळ कशी ती हेरली...' हे गाणे ऐकताच डोळ्यातून आजही अश्रू ओघाळतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आठवण या गाण्यातून भीमराव काळेनंद दादांनी करून दिलेली आहे. ते गाण्यात लिहतात की, शान जळता भारतभूची चितेवरती पाहिली ,पाहताक्षणी कालेनंदने श्रद्धांजली वाहिली...

डबडबलेल्या अश्रुंनीही महिमा त्यांची गाईली

अमर झाली भीमाची किर्ती डोळ्याने मी पाहिली...

जाता जाता हृदयी ही आमुच्या मूर्ति बुद्धाची कोरली...

दुष्ट काळाने भीमरायांची प्राणज्योत ती चोरली...

हे गाणं अजरामर ठरलं आहे.

मी मरेल तर या समाजासाठी, मी जगेल तर या समाजासाठी...' या गाण्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि समाजाप्रती असलेलं प्रेम काळेनंद यांनी लेखणीतून हुबेहूब लेखणीतून रेखाटले आहे.

२००५ साली महापूर आला होता. त्या महापुरात १५०० लिहून ठेवलेल्या गाण्यांच्या डायऱ्या पाण्यात वाहून गेल्या. त्यात विविध प्रकारची १५०० गाणी लिहिली होती. अशी आठवण त्यांनी मला स्वतः फोनवर सांगितली होती.

अनेक वेळा त्यांच्या सोबत माझा फोन वर संपर्क झाला असून, आम्ही अनेक गाण्यांवर चर्चा केली आहे. गाण्यांच्या डायऱ्या पाण्यात वाहून गेल्या. मात्र त्यांची लेखणी थांबली नाही. निस्वार्थी भावनेने ते लिहीत राहिले. आणि सर्वांच्याच ओठी जे नाव फुलू लागलं ते म्हणजे भीमराव काळेनंद...

त्यांनी लिहिलेली गाण्यांच्या डायऱ्या पाण्यात बुडून गेल्या. पाण्यामध्ये जरी डायऱ्या बुडून गेल्या. मात्र त्यांची लेखणी थांबली नाही ते लिहत



राहिले. आपल्या लेखणीतून प्रबोधन करत राहीले. भीमराव कालेनंद यांचे विशेष म्हणजे अनेक गाणी त्यांची तोंडपाठ होती. दादांनी फोनवर बोलताना माझ्याशी खंत व्यक्त केली होती. ते म्हणाले होते, 'मी जी गाणी लिहिली ती गाणी अजरामर ठरली. परंतु त्याचा मोबदला मला कधीच मिळाला नाही आणि मी कधी पैशामागे फिरलो ही नाही.' असं साधं, सरळ जीवन काळेनंद दादा आयुष्यभर जगले. आणि समाजामध्ये नावं त्यांनी कमावलं. आपली कला जोपासत त्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले. त्यांना चार मुले आणि दोन मुली आहेत. (अशोक, सम्राट , साजन, आकाश ,वैशाली ,कविता) नऊ महिन्यापूर्वी पत्नीचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे काळेनंदांनी लिहिलेली गाणी स्वरसम्राट प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, सुषमा देवी, रंजना शिंदे, दीपरुसवा, चंद्रकांत शिंदे अशा अनेक नामवंत गायक कलाकारांनी गायली आहेत. टी सिरीज, विनस, प्रीझम, कश्मीर इ. कॅसेट कंपनीने काळेनंद दादांच्या गाण्यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिली.

'जगात देखणी, भीमाची लेखणी' या अजरामर ओळी लिहिणारे महाकवी वामनदादा कर्डकांनी बाबासाहेब घराघरात पोहोचवला अशा महाकवी वामनदादा कर्डक तसेच स्वरसम्राट प्रल्हाद शिंदे यांचा सहवास काळेनंद दादांना काही काळासाठी लाभला.

१९८४ मध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाचं महामंडळ स्थापन करायच होत. त्यासाठी दिल्लीला देखिल ते गेले होते. त्यासाठी भीमराव काळेनंद दादांनी खूप धावपळ केली होती.

२००८ साली मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते कला भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

२०१७ साली अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद-पुणे ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने उत्कृष्ठ लेखनाचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. २०१७ साली अखिल भारतीय मातंग संघ, मानखुर्द मुंबई यांचेकडून 'समाजभूषण पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. २०१८ मध्ये बहुजन राष्ट्र समितीच्या वतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव सन्मान पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.२०२२ साली लोककवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी महोत्सव समिती कल्याण यांच्या वतीने 'जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. तर त्यांच्या कलेचे दखल घेऊन विविध ठिकाणी त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

आपल्या समाजातील घटक प्रबोधन,परिवर्तन करतोय म्हणूनच त्यांच्या कार्याची दखल घेवून, कल्याण येथिल सूत्रसंचालक शशिकांत चव्हाण आणि सामाजिक कार्यकर्ते सदानंद गायकवाड यांनी भीमराव काळेनंद आणि प्रसिद्ध गायिका सुषमा देवी यांना घरी बोलाऊन त्यांचा सन्मान केला. म्हणजेच बाबासाहेबांची चळवळ आपल्या कलेच्या माध्यमातून पुढे नेणाऱ्या कलावंतांचा सन्मान होणे ही काळाची गरज आणि आपली सामाजिक बांधिलकी आहे.

कलाकार पेन्शन योजना मिळावी म्हणून गेल्या पाच वर्षापासून त्यांची खटपट सुरू होती. २०२५ मध्ये त्यांना मोबदला मिळाला आणि फक्त दोन आठवडेच. म्हणजे शेवटच्या क्षणापर्यंत कलाकाराला वंचितच रहावे लागले. ज्या कलाकारांनी आपल्या लेखणीतून शेवटपर्यंत प्रबोधन आणि परिवर्तन केले अशा कलाकारांना वेळेतच न्याय आणि त्यांच्या हक्काचा मोबदला मिळाला पाहिजे. त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली असे समजले जाईल.

आमचे वडील आदर्श होते. त्यांची सेवा करण्याची संधी आम्हाला मिळाली. त्यांनी आम्हाला चांगले शिक्षण देऊन, आमच्यावर चांगले संस्कार दिले. आज आमच्या पंखात त्यांनी बल दिले आहे. अनेक गाणी त्यांनी लिहिली आणि समाजाच प्रबोधन केलं . त्यांनी लिहिलेल्या गाण्यातून त्यांच्या आठवणी आज जिवंत राहतील. जे त्यांचं साहित्य आहे. ते साहित्य आम्ही सांभाळून ते समाजापर्यंत पोहोचवणार आहोत. असे काळेनंद यांचा मुलगा सम्राट यांने माझ्याशी बोलताना सांगितले.

आजपर्यंत विविध विषयावरती त्यांनी गाणी लिहिलेली आहेत. सांस्कृतिक चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी या गाण्यांचा फायदा झाला आहे. समाज प्रबोधनासाठी जी गाणी लिहून ठेवली आहेत त्यांचा पुढे देखिल होणार आहे. म्हणून त्यांचे सर्वच लिखाण आंबेडकरी चळवळीसाठी अतिशय उपयुक्त असं ठरणार आहे. तर येणाऱ्या काळात डब्ल्यू,डब्ल्यू,डब्ल्यू बुद्ध,भीम, गीत ब्लॉगस्पॉट डॉट.कॉम या साइटवर तसेच रायटर बीए काळेनंद या यूट्यूब चॅनेलवर भिमराव काळेनंद यांचं लिखाण आपल्याला वाचायला मिळणार आहे.

दिनांक १९ जून २०२५ रोजी काळेनंद दादांची प्रकृती बिघडली त्यानंतर उल्हासनगर येथील एका हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती अधिक बिघडली आणि दिनांक २२ जून २०२५ रोजी पहाटे ३.३० वाजताच्या सुमारास वयाच्या ७८ वर्षी त्याची प्राणज्योत मावळली.

ही दुःखद बातमी समजताच पूर्ण महाराष्ट्र मध्ये शोककळा पसरली. आंबेडकरी चळवळीतील एक प्रतिभावंत महाकवी आपल्यातून निघून गेल्याने, त्यांनी लिहिलेल्या अजरामर गाण्यांचे स्टेटस सर्वांच्या मोबाईलवर दिसू लागले आणि त्यांना अभिवादन करू लागले.

पाश्चात देशात लिखाणाला महत्त्व : डब्ल्यू,डब्ल्यू,डब्ल्यू बुद्ध,भीम, गीत ब्लॉगस्पॉट डॉट.कॉम या वेबसाइटवर भारत देशाच्या बाहेरून सुद्धा काळेनंद दादा यांच्या गाण्याचे लिखाण लंडन, अमेरिका, न्यूझिडल, दुबई, युके, अशा विविध देशातून लिखाण वाचलं गेले आहे.

एवढं दर्जेदार लिखाण भीमराव काळेनंद यांनी केले असून बाहेरच्या देशातसुद्धा त्यांची गाणी लोकप्रिय ठरली आहेत.

सामाजे परिवर्तन : काळेनंद दादा यांना झाडे लावण्याची खूप आवड होती. काळेनंद दादा यांचा मुलगा सम्राट याने दोन वर्षांपूर्वी रत्नागिरी येथून आंबे आणले होते. आणि त्या आंब्याची कोय काळेनंद दादा यांनी घराजवळ लावली होती. ते रोप मोठ होऊन त्या झाडाची देखभाल स्वतः काळेनंद गेल्या दोन वर्षांपासून करीत होते.त्यांच्या मृत्यू नंतर काळेनंद यांच्या परिवाराने मोहने ,गालेगाव स्मशान भूमिच्या आवारात त्यांच्या अस्थीवर ते झाड आज लावण्यात आले आहे. त्या झाडाची निगा काळेनंद परिवार करणार आहे. म्हणजे अस्थी विसर्जित न करता काळेनंद यांच्या परिवाराने सामाजिक एक नवा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत आहे.

लेखकाला अंधारात ठेऊ नका : आजकाल गायक हा वेगाने फेमस होतो. गाणे देखील झपाट्याने व्हायरल होतात. त्या गाण्याच्या रिल्स बनतात. परंतु ज्यांच्या लेखणीने गाणं साकार झालेले आहे. त्या गाण्याच्या लेखकाला नेहमीच अंधारात ठेवले जाते. असंख्य गाणी युट्युबवर टाकली जातात. परंतु लेखकाच्या नावाचा विसर पडलेला असतो. ज्याने गाणं जन्माला घातलं आहे. त्याच नावं आलेच पाहिजे. ही देखील खबरदारी, जबाबदारी आणि सामाजिक बांधिलकी आपण जपली पाहिजे. लेखक हे गाण्याचे मूळ निमिते असतात आणि त्यांना गाण्याचे कॉपीराइट मिळू शकतात. ज्येष्ठ कवी, गायक भीमराव काळेनंद यांचे साहित्य सांस्कृतिक चळवळ अधिक गतिमान करणारे साहित्य आहे.

आपल्या कलेच्या माध्यमातून समाज परिवर्तन आणि प्रबोधन करणाऱ्या कलावंतांच्या आठवणी जिवंत ठेवणे आजच्या तरुणांनी, कार्यकर्त्यांनी खूप महत्त्वाचे आणि गरजेचे आहे. त्यातूनच आपल्याला प्रोत्साहन मिळत असते.

त्यांनी विविध विषयावरती केलेले लिखाण, साहित्य प्रत्येकाच्या घराघरांमध्ये पोहोचवण्याचा काम आपण सर्वजण करूया. तेव्हाच खऱ्या अर्थाने कवी भीमराव अर्जुन काळेनंद यांना अभिवादन ठरेल.

**कवी, पत्रकार : मिलिंद सुरेश जाधव**
**पडघा भिवंडी**
**मो.८६५५५६९४३६**

## इंदापूरच्या आश्रमशाळेत लोकराजा राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे : इंदापूरच्या भिमाई आश्रमशाळेत राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. यावेळी मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर या शिक्षण संस्थेच्या अंकित असणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे आणि मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते माऊली नाचण यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार, तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीस व दिवंगत रत्नाकर (तात्या) मखरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणं झाली. प्रा. जावेद शेख यांनी भाषणातून शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर विचार व्यक्त करत त्यांच्या कार्याला उजाळा दिला. माऊली नाचण यांनी शाहू महाराजांवर स्वतः लिहिलेली कविता उपस्थितांसमोर सादर केली.यावेळी संस्थेचे सचिव ड.समीर मखरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे, संचालक गोरख तिकोटे, विद्यार्थी,शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हिरालाल चंदनशिवे यांनी सूत्रसंचालन केले.

## राज्यातील सुधारित पीक विमा योजनेचा जाहीर निषेध : राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : लातूर:महाराष्ट्र शासनाने सन २०२५ २६ करीता सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना जाहीर केले आहे त्याचा जाहीर निषेध महाराष्ट्र राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे.

शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना एक रुपयात विमा जाहीर केला होता, परंतु आता सुधारित योजनेत सोयाबीनला प्रतिहेक्टर ११६० रुपये,कापसासाठी ९०० रुपये, तुरीसाठी ४७० रुपये शेतकऱ्यांना भरावे लागणार आहेत. शासनाने पूर्वी १५ ऑगस्टपर्यंत पेरणी न झाल्यास किंवा दुबार पेरणी झाल्यास २५% रक्कम देण्याची तरतूद रद्द केली आहे.नैसर्गिक आपत्तींचा कुठलाही घटक आता या योजने मध्ये नाही.ज्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणे कठीण होईल.



कृषी विभागाने शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे उत्पन्न कमी दाखवून आणि उत्पन्नाची आकडेवारी ८ ते ९ क्विंटल प्रति हेक्टर करून ठेवल्यामुळे विमा मिळणार नाही. आता विमा कंपनीसोबत ८०% वाटा सरकारचा आहे त्यामुळे शेतकऱ्यांना विमा नाही मिळाला तर शासनाचा फायदा होईल असे धोरण नवीन योजनेत राबवले आहे त्यामुळे या योजनेचा जाहीर निषेध करतो व पूर्वीप्रमाणेच पिक विमा धोरण ठेवावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू : सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर

## विधिवत पुजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दरवर्षी आषाढी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. यावर्षी दिनांक २७ जून रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पुजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला आहे. विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड; तर रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन सुरू रा-हणार असल्याचे सह अध्यक्ष गहिनीनाथ





महाराज औसेकर यांनी सांगितले.

श्रींचा पलंग काढल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती आदी राजोपचार बंद होवून नित्यपुजा, महानैवेद्य व गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. दिनांक १६ जुलै (प्रक्षाळपुजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध असणार आहे. श्रींचा पलंग काढताना पुजेवेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतलाताई नडगिरे, ड माधवीताई निगडे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, विभाग प्रमुख संजय कोकीळ, अतुल बक्षी व पौरोहित्य करणारे कर्मचारी उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती यशाबद्दल मुख्याध्यापक आर. पी. ईठूले व विद्यार्थी सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



गोदिंया : तालुक्यातील नंगपूराम ुरीं येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेचे सलग तीन वर्ष माध्यमिक शिष्यवृत्ती परी-क्षेचे मध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे मुख्याध्यापक आर. पी. ईठूले यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी मंचावर आमदार राजकुमार बडोले यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक आयुक्त किशोर भोयर, साहित्यिक लखनसिह कटरे, अतिरिक्त निव-ासी जिल्हाधिकारी, हितेंद्र डोंगरे, भदन्त संघधातू, डॉ. सविता बेदरकर तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

सन २०२३ ते २०२५ या कालावधीमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरामुर्री येथील प्रत्येक वर्षी ७, ८ उत्तीर्ण झाले. संपूर्ण ५० विद्यार्थी गोंदिया जिल्ह्यामधून बसले होते पण फक्त सदर शाळेचेच विद्यार्थी पास झाले. त्याबद्दल उत्तीर्ण विद्या-र्थी व शाळेचे प्रतिनिधी म्हणून मुख्याध्यापक रविशंकर ईठूले यांना सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल परीश्रम करणारे शाळेचे शिक्षक नीता भलमे, प्रदीप ढवळे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, मुन्नाभाई नंदागवळी यांनी सदर विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी अथक परिश्रम घेतले होते. म्हणून या परीक्षेत यश प्राप्त करता आले.

सदर विद्यार्थ्यांमध्ये सावन जाधव, योगेश डोंगरे, अनामिक दुर्योधन त्याबरोबर शिष्यवृत्तीमध्ये विक्रांत टेंभुर्णे, अंश राऊत, सुशांत वालदे, मेश्राम, सौरभ साऊस्कार यांचा सहभाग होता.

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची महाराष्ट्र युवा धोरण समितीवर सदस्य म्हणून निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : महाराष्ट्र शास-नाने राज्यातील युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन युवा धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. या धोरणाच्या निर्मितीसाठी एक विशेष समिती गठित करण्यात आली असून, या समितीवर सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या समितीमध्ये युवा सक्षम ीकरण, शिक्षण, रोजगार, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक विकास या क्षेत्रांशी संबंधित अन्य व्यक्तींचाही समावेश आहे. ही समिती युवा धोरणाचा मसुदा तयार करेल आणि राज्यातील युवकांच्या आकांक्षा आणि आव्हानांना साम ोरे जाण्यासाठी ठोस उपाययोजना सुचवेल.



भागधारकांशी चर्चा करून त्यांचे मत जाणून घेईल. याशिवाय, समिती परद-ेशातील आणि इतर राज्यांतील यशस्वी युवा धोरणांचा अभ्यास

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागाने जारी केलेल्या निवेदनानुसार, समितीला धोरणाचा अंतिम मसुदा तयार करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या कालावधीत समिती राज्यभरातील युवक, स्वयंसेवी संस्था आणि इतर करून त्यांचा समावेश नवीन धोरणात करेल. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख हे स्वतः हा उच्चशिक्षित असून त्यांच्या नियुक्तीमुळे राज्यातील युवकांना त्यांच्या गरजा आणि आकांक्षा पूर्ण करणारे एक सर्वसमावेशक आणि प्रभावी धोरण मिळण्याची आशा आहे.

# दक्षिण सोलापूर तालुका खरीप पीक कर्जवाटप आढावा सभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, यांच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शेतकऱ्यांना निर्धारित लक्षांकाप्रमाणे बँकामार्फत पुरेशा प्रमाणत व विहित वेळेत पीक कर्जपुरवठा होण्यासाठी तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्ज वाटप आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन मा. सुभाष देशमुख साहेब, विधानसभा सदस्य, दक्षिण सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर दत्त-त्रय मोरे, राम वारकडे, लीड बँक मॅनेजर, कृषी विभागाचे प्रतिनिधी व तालुक्यातील सर्व बँक शाखाधिकारी उपस्थितीत



दिनांक-२३ जून २०२५ रोजी बहुउद्देशीय सभागृह, जुने जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, सोलापूर येथे तालुका दक्षिण सोलापूर मधील खरीप पीक कर्ज वाटप आढावा सभा संपन्न झाली.

शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बँकांनी सहकार्य करणेबाबत मा. आमदार सुभाष देशमुख यांनो अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. दक्षिण सोलापूर तालुक्यातील बँकांनी एक शाखा एक गाव पालकत्व घ्यावे, शेवटच्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी प्रयत्न करा. बँकांनी दिलेले उद्दिष्टे पूर्ण करावे. शेतकऱ्यांची अडवणूक करू नका. बँका आणि शेतकरी यांचा समन्वय असावा. शेतकऱ्यांना गरज असेल त्यावेळी तात्काळ मदत करावी. शेतकरी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बँकानी सहकार्य करावे. अशा सूचना आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण तालुक्यातील बँकेच्या सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.

मा. आमदार देशम ुख म्हणाले, नियमित कर्ज भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करा व त्यांना प्रोत्साहन द्या. सर्व बँकानी शेतकरी मेळावे घेऊन जनजागृती करावी. बँकाच्या परिसरात ग्राहकांना सोईसुविधा द्या. शासनाच्या योजना आपल्या बँका मार्फत राबविल्या जा-तात. त्याची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने करा. बँकांनी विकासाचा केंद्रबिंदू बनून काम करावे. एक गाव एक पद्धतसाठी बँकानी शेतकऱ्यांना सहकार्य करावे. बचत गटांच्या महिलांना अर्थसहाय्य करावे व त्यांना उद्योजक करावे. त्यामुळे शेतकऱ्यांचा बँकेवर चा विश्वास वाढेल.

जिल्ह्यात पर्यटन सप्ताह साजरा करा २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये सोलापूर जिल्ह्यात पर्यटन सप्ताह साजरा करा.

आपल्या शाखेला नागरिकांना भेटी देण्यासाठी आपल्या शाखेने वेगळेपण निम ाण करावे. आर्थिक साक्षरता होण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचनाही आमदार सुभाष देशमुख यांनी केल्या.

सदर माहिती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था दत्त-त्रय मोरे यांनी दिली.

# छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित निघाली दि बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूलची रॅली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित आणि शाळेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त दि बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूल ची भव्य आणि दिव्य रॅली आज गुरुवार दिनांक ,२६ जून रोजी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून काढण्यात आली.डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून ही भव्य रॅली शाळेच्या परिसरातील प्रमुख मार्गावरून निघून शाळेत विसर्जित झाली.

**भव्य रॅली**

छ.शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित आज गुरुवार दिनांक २६ जुन २५ रोजी सकाळी ९ वाजता दि. बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने विद्यार्थ्यांची भव्य दिव्य रॅली येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून काढण्यात आली होती या रॅली मध्ये नर्सरी



पासून ते सर्व वर्गांचे विद्यार्थी हा-तात शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त विविध घोषवाक्ये आणि या घोषवाक्यामधून सामाजिक संदेश देणारे फलक हातात घेऊन उत्स्फूर्त पणे सहभागी झाले होते.

दि.बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूलच्या प्रिन्सिपल तरन्नुम शेख यांनी संस्थेचे प्रमुख संदीप उडानशिव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्कूल च्या सर्व स्टाफ यांच्या सहकार्याने व पालकांच्या उपस्थिती मध्ये ही भव्य रॅली काढण्यात आली. गुरूवार दि. २६/०६/२०२५ रोजी शाळेचा ' दहावा वर्धापन दिन' असल्यामुळे आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती चे निम्मित साधून या रॅली चे आयोजन करण्यात आले होते.अशीही माहिती प्रिन्सिपल शेख यांनी दिली.

सर्व विद्यार्थ्यांनी पांढरा युनिफॉर्म घालून सकाळी ठीक ८.३० वाजता आंबेडकर उद्यानात हजर झाले होते. ही अतिशय सुंदर अशी भव्य दिव्य रॅली सकाळी ९.०० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानातून सुरू झाली आणि ही रॅली दुपारी एक वाजता स्कूल च्या मैदानात समाप्त करण्यात आली. सर्व पालक तसेच शाळेचा सर्व स्टाफ यावेळी उपस्थित होते प्ले ग्रुप म धील लहान बालक विद्यार्थी सतेज शंकर गायकवाड हा या रॅली मध्ये उत्स्फूतपणाने सहभागी झाला होता.



# जिल्हा परिषद कोल्हापूरचे डॉ. विष्णू निर्मळे शाहू पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सुपुत्र सैनिक टाकळी येथील पशुवैद्यकीय पर्यवेक्षक डॉक्टर विष्णू शिवाजी निर्मळे यांना २०२५ या वर्षीचा छत्रपती शाहू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आपल्या कर्तुत्वाने व प्रामाणिकपणाने आपल्या कामाचा ठसा उमटवलेला आहे याची दखल घेऊन पुरस्कार मा.खासदार श्रीमंत शाहूम हाराज, कोल्हापूर जिल्हा पालकमंत्री प्रकाश आंबिटकर, जिल्हाधिकारी अम ोल येडगे, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी पत्नी सौ गीता विष्णू निर्मळे, कु. हर्षदा निर्मळे, श्रीतेज निर्मळे, मारुती निर्मळे, केदार निर्मळे उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मचारी, उपस्थित होते.

**गोपाळपूर येथील स्वेरी कॉलेजमध्ये कार्यक्रम संपन्न**

**ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे यांचा निसर्गमूल्यांचा जयघोष**

# यंदाचा किर्लोस्कर वसुंधरा सन्मान ह.भ.प.शिवाजीराव मोरे यांना प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वारी ही एक आध्यात्मिक परंपरा आहे शिवाय, ती एक संस्कृतीक आणि सामाजिक परंपरा देखील आहे. ती आत्म्याशी आणि निसर्गाशी संवाद साधण्याची देखील एक परंपरा आहे. या परंपरेचे खरे वारसदार असलेले आदरणीय ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे यांना दि. २६ जून रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये 'किर्लोस्कर वसुंधरा सन्मान २०२५' प्रदान करण्यात आला, यावेळी किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड चे व्यवस्थापकीय संचाक आर व्ही गुमास्ते, महाराष्ट्र पॉल्युशन कंट्रोल बोर्ड



सोलापूर चे सब रिजनल ऑफिसर निखिल मोरे, स्वेरीचे संस्थापक अध्यक्ष बी पी रोंगे, किर्लोस्करचे महोत्सव समन्वयक सुवर्णा भांबुरकर हे मान्यवर उपस्थित होते.

किर्लोस्कर वसुंधरा पुरस्कार केवळ सन्मानाची बाब नाही, तर ती निसर्गाशी नाते जोडणाऱ्या अध्यात्मिक चळवळीच्या कार्याला दिले-ली उज्ज्वल मान्यता आहे. जगदगुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पवित्र वंशातून जन्माला आलेले ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे हे केवळ कीर्तनकार, प्रवचनकार नाहीत - ते निसर्गाचे कीर्तन सांगणारे सत्पुरुष आहेत. त्यांनी वारीच्या पावलोपावली निसर्गाची आठवण करून देणारे कार्य केले आहे. पालखी महामार्गावर ला-वलेली वृक्षे केवळ हरित पट्टा नाहीत, ती वारकऱ्यांच्या श्रमाला सावली देणारी, त्यांच्या श्रद्धेला स्फूर्ती देणारी जीवनवृक्ष आहेत.

**किर्लोस्कर वसुंधरा सन्मान २०२२५ या पुरस्काराच्या माध्यमातून मोरे महाराजांचे हे निसर्गाच्या सेवेचे कार्य आता संपूर्ण महाराष्ट्रासम ोर आले असून, हा सन्मान भविष्यातील पर्यावरणशील अध्यात्माचा दिशादर्शक दीपस्तंभ ठरेल, यात शंका नाही.**

त्यांनी फक्त झाडं लावा इतक्यावर न थांबता, त्यांचे संगोपन, त्यांचं संरक्षण, आणि समाजाशी त्यांचं भावनिक नातं जपण्याची एक चळवळच उभी केली आहे. गावागावांतून युवकांना, शाळांना, महिला मंडळांना हे झाडं आपलं मानायला शिकवलं आहे. झाडं लावणं त्यांच्या दृष्टीने एक 'धर्मकृत्य' आहे - जणू 'वृक्षारोपण म्हणजे भक्तीचा एक अविभाज्य भाग'. पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना सावली देण-ारी ही झाडं, आणि त्यामागे असलेली मोरे महाराजांची दूरदृष्टी, ही अध्यात्म आणि पर्यावरण यांची जुळवलेली सुंदर सांगड आहे. यावेळी त्यांनी प्रतिवर्षी २० हजार प्रमाणे पुढील ५ वर्षात एक लाख वृक्ष पालखी महामार्गावर लावण्याचा संकल्प केला आहे.

# आषाढी वारीला आलेल्या वारकरी भाविकांच्या सोयीसाठी मंदिर समिती सुसज्ज

## यात्रा नियोजनाच्या अनुषंगाने मंदिर समितीची सभा संपन्न : सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी एकादशी रविवार, दिनांक ०६ जुलै रोजी आहे. या यात्रेला अंदाजे १२ ते १५ लाख वारकरी भाविक येतात. या भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उप-लब्ध करून देण्यात येत आहेत. त्याम ध्ये दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, तात्पुरत्या स्वरूपातील उड्डाणपुले, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालिन गेट, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा खिचडी वाटप करण्यात येत असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.




आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. सदर बैठकीस मंदिर समितीचे सदस्य डॉ. दिनेश-कुमार कदम, संभाजी शिंदे, ड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा व खाते प्रम ुख उपस्थित होते.

या बैठकीमध्ये आषाढी यात्रेच्या नियोजनाच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला. दर्शनरांगेत मोठ्या प्रम ाणात भाविक आहेत, या भाविकांचे लवकरात लवकर दर्शन होण्यासाठी दर्शनरांग जलद व द्रुतगती-ने चालविणेकामी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आ-हेत. पंरपरेनुसार श्रींचा पलंग काढल्याने दैनंदिन २४ तास मुखदर्शन व २२.१५ तास पदस्पर्शदर्शन उपलब्ध होत आहे. याशिवाय, संकेतस्थळावरून व जागोजागी एलईडी टिव्हीद्वारे लाईव्ह दर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच या यात्रा कालावधीतील श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असून, श्रींचा पलंग काढणे, एकादशीच्या सर्व पुजा, महानैवेद्य, संतांच्या भेटी, श्रींच्या पादुकांची मिरवणूक, महाद्वार काला, प्रक्षाळपुजेचे योग्य ते नियोजन करण्यात आले आहे.

**मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे यांना किर्लोस्कर ग्रुपतर्फे दिला जाणारा यंदाचा 'किर्लोस्कर वसुंधरा सन्मान २०२५' प्रदान करण्यात आला असल्याने, त्यांच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करून, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ म हाराज औसेकर यांच्या हस्ते तुळशीचा कंठा, उपरणे व श्रींची मुर्ती देऊन सन्मान करण्यात आला.**





याशिवाय, कर्मचा-यांना प्रशिक्षण, रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यासह, सिझफायर यंत्रणा, चंद्रभागा नदीप-ात्रात आपत्ती व्यवस्थापन पथकाची नियुक्ती, अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅम ेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी इ. व्यवस्था करण्यात आली आहे. देणगी साठी जादा स्टॉलची निर्मिती व ऑनलाईन देणगीसाठी ठ उजऊ, सोने-चांदी वस्तु दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा, चंद्रभागा वाळवंट इ. ठिकाणची स्वच्छता करण्यात येत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.






तसेच वैद्यकीय सेवेच्या दृष्टीने रूग्णवाहिका वैद्यकीय पथकासह, प्रथमोपचार केंद्र, स्वयंसेवी संस्थेमार्फत मोफत वैद्यकीय व्यवस्था असणार आहे. याशिवाय, आरोग्य विभागामार्फत दर्शनमंडप व पत्राशेड येथे आयसीयु, गोपाळपूर, बाजीराव पडसाळी, सारडा भवन इत्यादी ठिकाणी आरोग्य व्यवस्था असणार आहे. महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष तसेच चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहेत.

श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडूप्रसाद व त्यासाठी पश्चिमद्वार, उत्तरद्वार, श्री संत तुकाराम भवन येथे स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच दर्शनरांगेत शाबुदाणा / तांदळाची खिचडी तसेच दासोह रत्न चक्रवती दानेश्वर महाराज श्री. बसवगोपाल नीलमाणिकमठ बंडिगणीमठ, बागलकोट या स्वयंसेवी संस्थेमार्फत पत्राशेड येथे भोजनाची व्यवस्था करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# स्वेरीच्या ३ विद्यार्थ्यांची 'होम फर्स्ट फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीत निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः 'होम फर्स्ट फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने गोप-ाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेर-ीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये घेतलेल्या निवड प्रक्रियेतून एम.बी.ए. विभागातील ३ विद्यार्थ्यांची निवड केली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.




'होम फर्स्ट फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने गोपाळपूर येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये घेतलेल्या निवड प्रक्रियेच्या अंतिम फ ेरीतून एम.बी.ए. विभागातील दिपक दत्तु नाईकनवरे, ज्ञानेश्वर युवराज कदम व ऋषिकेश शामसुंदर कोरडे या ३ विद्यार्थ्यांची निवड केली. १९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी अभियांत्रिकीमधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हज-ारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. 'स्वेरी' मधून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते. स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी उप-लब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ऑप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोस-ले, उपाध्यक्ष सुरेश राऊत तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्च-ार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'होम फर्स्ट फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या तीनही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मंगळवेढा तालुक्यासाठी तीन टन तुरीचे बियाणे उपलब्ध : आ. आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी :

सध्याच्या हंगामामध्ये शेतकऱ्यांसाठी तूर बियाणे उप-लब्ध झाले असून मंगळवेढा कृषी कार्यालयाकडे तीन टन तुरीचे बियाणे उपलब्ध झाले आहे तरी तूर लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून या चांगल्या प्रतीच्या बियाण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार समाधान आवताडे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.



यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले की,केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्पात संपुर्ण देशात कडधान्य मिशन राबविण्याची घोषणा केली आहे. हे मिशन पुढिल सहा वर्षासाठी असेल. केंद्रिय कृषि मुल्य आयोग मार्फत खरीप सन २०२५-२६ साठीचे हमीभाव जाहीर करण्यात आले असून सर्व कडधान्याच्या हमिभावांमध्ये ५ टक्के पेक्षा जास्त वाढ केली आहे. तूर पिकाचा हमिभाव मागील ७ हजार ५५० रुपये प्रती क्विंटल वरून ८ हजार रुपये प्रती क्विंटल करण्यात आला आहे. तसेच उडीद पिकाचा हमिभाव मागील ७ हजार ४०० रुपये प्रती क्विंटल वरून ७ हजार ८०० रुपये प्रती क्विंटल करण्यात आला आहे. शेतक-यांकडून कडधान्याची नाफेड व एनसी-सीएफ खरेदी करणार आहे. या दोन एजन्सीकडे नोंदणी केलेल्या शेतक-यांची संपुर्ण तूर व उडीद खरेदीची शाश्वती देण्यात आली आहे.

कृषि विभाग मार्फत तूरीच्या वाढीच्या आवस्थे दरम्यान विविध शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात किड व रोगाच्या व्यवस्थापना संदर्भात मार्गदर्शन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कृषि विभागा मार्फत तूरीचे बियाणे प्राप्त करुन पेरणी करावी असे आवाहन आमदार समाधान कडे यांनी केले आहे.

या संदर्भात सविस्तर माहिती सांगताना तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ यांनी सांगितले की तुरीचे (वाण - भिमा) बियाणे उपलब्ध झाले आहे. सदर तूर लाल रंगाची असून बागायत व जिरायत दोन्ही प्रकारे पाण्याचा निचरा होणा-या सर्व प्रकारच्या जमिनीमध्ये लागवडीसाठी योग्य आहे. दोन ओळीतील अंतर ६ फुट व दोन रोपातील अंतर २ फुट तसेच दोन ओळीतील अंतर ५ फुट व दोन रोपातील अंतर २ फुट लागवड केल्यास चांगले उत्पन्न मिळू शकते तसेच एकरी ७००-९०० ग्रॅम बियाणे पुरेसे आहे. कृषि विभागामार्फत वाटप करण्यात येणारे बियाणे ४ किलो पॅकिंग मधील असून एका बॅग मध्ये ५ एकर तूरीची पेरणी होवू शकते.

तुरीचे भिमा वाण १० जुलै पर्यंत लागवडीसाठी फायदेशीर असून योग्य व्यवस्थापन केल्यास एकरी ८ ते १० क्विंटल उत्प-ादन मिळू शकते. तूर पेरणी वेळी प्रती किलो बियाण्यास १० ग्राम ट्रायकोडर्माची बिजप्रक्रीया केल्यास मर रोगाचे प्रमाण अटोक्यात राहते त्याच बरोबर जैविक जिवाणूसंघाची प्रती किलो बियाण्यास १० मिली बिजप्रक्रीया केल्यास उत्पन्न १० ते २० टक्के वाढू शकते.

पेरणी करताना एकरी ५० किलो डिएपी खताची मात्रा द्यावी. बियाणे उगवून आल्यानंतर पहिल्या २० ते ३० दिवसाच्या आत रोपांची विरळणी करुन रोपातील अंतर ६ । २ किंवा ५२ राहिल याची दक्षता घ्यावी. विरळणी झाल्या नंतर ५ टक्के निंबोळी अर्क व २ टक्के युरियाची फवारणी करावी. पहिली छाटणी ४०-४५ दिवसात व दुसरी छाटणी ६० ते ६५ दिवसात करुन घ्यावी.

इच्छूक शेतकऱ्यांनी संबंधीत गावच्या कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क करावा असे अहवान तालुका कृषि अधिकारी श्रीमती मनिषा मिसाळ यांनी केले आहे.

### कार्यकर्त्यांचा फटाक्याची आतषबाजी करून जल्लोष

# भाजपच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी चेतन सिंह केदार यांची फेरनिवड; राजेंद्र कोरके पाटील यांनी केला सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जिल्हाध्यक्ष पदाच्या कार्यकाळात भारतीय जनता पार्टी संघटना पूर्व अभियानांतर्गत भारतीय जनता पक्षाचे सदस्य नोंदणी राज्यात प्रथम क्रमांकाची नोंदणी करत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दखल घेत परत त्यांची सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी फेरनिवड झाल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतषबाजी करून जल्लोष करण्यात आला.

जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीची पकड घट्ट करण्यासाठी भाजप प्रदेश कार्यकारणीच्या आदेशानुसार सदस्य नोंदणी जोरदार मोहीम हाती घेतली होती. या अभियानात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत सोलापूर जिल्हा पश्चिम पश्चिम जिल्हा भाजप सदस्य नोंदणी महाराष्ट्रात अव्वल ठरला आहे. याची पोचपावती म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकारणीच्या स्वाक्षिनी भाजपचे सोलापूर ग्रामीण पश्चिम चे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार यांचा सन्मान करून शाब्बासकी दिली.

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी सदस्य नोंदणी उद्दिष्ट दिले होते. जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी दिव-सरात्र मेहनत करून सोला-पूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील तालुकाप्रमुख शक्ती प्रमुख बुथ प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांनी भाजप सदस्य मोहिमेत राज्यात अवल्य क्रमांक पटकावला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपचे प्रदेशाध्यक्ष महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे कार्यकारी अध्यक्ष तथा संघटन पर्व प्रभारी रविंद्र चव्हाण उच्च व शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर आमदार चित्राताई वाघ देश महामंत्री राजेश पांडे पश्चिम म हाराष्ट्र मंत्री मकरंद देशपांडे आम दार सचिन कल्याण सिटी माजी आमदार राजाभाऊ राऊत माजी आमदार प्रशांत परिचारक ओ राम सातपुते यांच्या सर्वांच्या



मदतीने सदस्य नोंदणी करण्यात आली असे सोलापूर जिल्ह्याची अध्यक्ष चेतन सिंह केदार यांनी माहिती दिली

# एसबीआयच्या स्थापना दिनानिमित्त अक्कलकोट शाखेच्या शिबिरात ५९ जणांचे रक्तदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : भारतीय स्टेट बँकेच्या ७० व्या स्थापनादिनाचे औचित्य साधून अक्कलकोट शाखेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यात ५९ जणांनी सहभाग नोंदवला.विशेष म्हणजे बँकेच्या ग्राहकांनीही या उपक्रमात उत्साहाने भाग घेतले होते.



अक्कलकोट शाखेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन एसबीआयचे डीजीएम हरीशकुमार राजप-ाल यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी तहसिलदार विनायक मगर,एजीएम आनंदकुमार पाटकर, स्टाफ असोसिएशनचे धनंजय होनम ने, अविनाश गुरव, शाखा अधिकारी विकास खडतकर,श्री वटवृक्ष देवस्थानचे प्रशांत म ालक इंगळे, सी.ए ओमकारेश्वर उटगे, राजशेखर हिप्परगी उप-स्थित होते.

शाखा अधिकारी विकास खडतकर बोलतांना म्हणाले की,रक्तदान ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. समाजासाठी असे उपक्रम नियमितपणे राबवण्याचा आम चा संकल्प आहे.या उपक्रमात बँकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच ग्राहकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकी जपली. विशेष म्हणजे बँकेतील ग्राहकांनीही या उपक्रमात मोठया उत्साहाने भाग घेत रक्तदान केले.आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे दर्शन घडविले.

यावेळी फिल्ड ऑफिसर केदारनाथ चौगुले, सर्विस मॅनेजर मनीष वानखेडे, सहाय्यक प्रबंधक अभय देव्हारे, धवल भजभुजे, बोरोटी रेल्वे स्टेशनचे मॅनेजर राकीकुमार, एसटीबीएस यलगोंडा कोळी, बापु डोणे यांच्यासह बँक कर्मचारी व बँक गार्ड उपस्थित होते.